Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - III MARCH 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# भारतातील शिक्षणाची वाटचाल : एक दृष्टिक्षेप

प्रा. साधना मौंदेकर
सहाय्यक प्राध्यापक
श्री निकेतन कला–वाणिज्य महाविद्यालय,नागपूर

**प्रस्तावना :**

भारतात बौद्ध धम्मामुळे शिक्षणाचा प्राचीन काळात मोठया प्रमाणावर विकास झाला होता. ज्या काळात जगात कुठेही विद्यापीठे अस्तित्वात नव्हती. त्या काळात नालंदा विद्यापीठ हे आंतराष्ट्रीय स्तरावरील विद्यापीठ भारतात होते. इतर देशातील विद्यार्थी या विद्यापीठात शिक्षण घ्यायला यायचे. तसेच त्या काळात बौद्ध विहारे ही शिक्षणाची केंद्र होती. परंतू मुस्लिम आक्रमणाने अस्तित्वात असलेली विद्यापीठे आणि तेथील ग्रंथालये जाळून नष्ट केली. बौद्ध धम्माचा ऱ्हास झाल्यानंतर भारतातील शिक्षणाची वैभवशाली परंपरा नष्ट होऊन भारत शिक्षणाच्या संदर्भात मागासलेला राहिला.

**वैदिक काळातील शिक्षण पद्धती :**

बौद्धकालीन शिक्षण पद्धतीपूर्वी भारतात वैदिक शिक्षण पद्धतो होती. या पद्धतीमध्ये विद्यार्थी गुरू किंवा आचार्यांच्या घरी जाऊन शिक्षण घेत होता. वेदाचे शिक्षण घेण्याचा अधिकार ब्राम्हण वर्गापूरताच मर्यादित होता. वैदिक शिक्षण हे मर्यादित लोकांकरिता होते. म्हणून वैदिक काळात शिक्षण पद्धतीचा विकास झाला नव्हता. परंतू बौद्ध शिक्षण पद्धतीमुळे भारतात शिक्षण पद्धतीचा विकास झाला. बौद्ध शिक्षण पद्धती 12 व्या शतकापर्यंत अस्तित्वात होती. परंतू बौद्ध विद्यापीठाचा विध्वंस झाल्यानंतर ही शिक्षण पद्धती भारतातून नष्ट झाली.

**मध्ययुगीन काळातील शिक्षण पद्धती :**

भारतात मध्ययुगीन काळात मुस्लिमांची सत्ता होती. या काळात मदरशामार्फत शिक्षण दिले जायचे. इ.स. 1192 मध्ये मोहम्मद घोरीन ने भारतावर आक्रमण केले. त्यावेळी दिल्लीवर राजपूतांची सत्ता होती. पृथ्वीराज चव्हाणाचा पराजय करत घोरीने दिल्ली काबीज केली आणि भारतात मुस्लिम राजवटीची सुरूवात झाली. कुतुबुद्दिन हा गुलाम वर्षाचा पहिला सुलतान होता. त्याने इ.स. 1206 ते 1210 पर्यंत राज्य केले. त्याने मशिदी बांधून तेथे 'मकतब' स्थापन केले. 'मकतब' म्हणजेच प्राथमिक शाळा होय. त्यानंतर रझिया सुलतान ने इ.स. 1236 ते इ.स. 1242 पर्यंत राज्य केले. तिने 'मदरशा' या शिक्षण केंद्राची दिल्लीला स्थापना केली. त्यानंतर लोदी वंशाचा संस्थापक बहलोल मोदी हा इ.स. 1451 मध्ये गादीवर आला. त्याने राज्यात शिक्षण संस्था निर्माण केल्या. जहिरूद्दिन मोहम्मद बाबर हा मोगल घराण्याचा भारतातील पहिला बादशहा होय. त्याच्या राजवटीत मदरसे आणि मकतब नव्याने सुरू करण्यात आलेत. बाबरचा मुलगा हुमायू याने मोठया ग्रंथालयाची स्थापना केली. यानंतर इ.स. 1556 मध्ये अकबर बादशहा याने शिक्षणाला नवे अधिष्ठान दिले. त्याच्या कारकीर्दीत विद्यार्थ्यांने शिक्षण घेतल्यावर तो स्वतःच्या पायावर उभा राहिला पाहिजे. अशी शिक्षणाची व्यवस्था करून ठेवली. त्यादृष्टिने मकतब आणि मदरसाची स्थापना झाली. मध्ययुगीन काळात मुस्लिम राजांनी मुस्लिम शिक्षणाची व्यवस्था केली होती. या काळातील शिक्षणावर धर्माचा अधिक प्रभाव होता. म्हणून त्यावेळेच्या शिक्षण संस्थाचे स्वरूप हे धर्माचा संस्कार करणाऱ्या केंद्राप्रमाणे होते. मध्ययुगीन काळात शिक्षण संस्थाचे अनेक प्रकार होते. उदा. मकतब, खानकाह, दरगाह, कुराण शाळा, फारसी शाळा, अरबी शाळा व मदरसा इ. या शिक्षण प्रकारांपैकी मदरसा हा शिक्षणाचा असा प्रकार होता की, जेथे अध्यापन करण्यासाठी व्याख्यान पद्धतीचा उपयोग केला जायचा व या ठिकाणी शिक्षणाचे माध्यम फारसी भाषेत असायचे. मदरशा हे मशिदीला संलग्न असायचे व मदरशाला लागूनच वसतीगृहाची सोय केलेली असून त्यात निवास व भोजनाची व्यवस्था होती. तसेच त्यात विद्यार्थी व शिक्षक राहायचे यात मुलींना शिक्षण घेण्याची मुभा होती.

मध्ययुगीन काळात मुस्लिम राजवटीत देखील ब्राम्हण वर्गाने आपले शिक्षण परंपरा कायम ठेवली होती. बनारस व इतर काही धार्मिक स्थळी, ब्राम्हण लोकशाळा चालवित असत. या शाळांमध्ये संस्कृत, भाषा, लोकशाळा चालवित असत. या शाळांमध्ये संस्कृत, भाषा, व्याकरण, गणित इ. विषयाचे शिक्षण दिले जायचे. धार्मिक स्थळी किंवा सधन गृहस्थांच्या घरी विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय होती. या शाळांमध्ये केवळ ब्राम्हण विद्यार्थ्यांनाच शिक्षण घेण्यासाठी प्रवेश मिळत होता. मध्ययुगीन काळात मुस्लिमांना शिक्षणासाठी विशेष प्रोत्साहन देण्यात आले होते. तर हिंदू समाजात ब्राम्हण आपल्या घरी खाजगी शाळा काढून ब्राम्हण विद्यार्थ्यांना शिक्षण देत होते. भारतातील सामान्य जनता मात्र शिक्षणापासून वंचित होती. म्हणून

मध्ययुगीन काळात शिक्षणाचा विशेष विकास होऊ शकला नाही.

इ.स. 1542 मध्ये भारतात पोर्तुगीज लोक आलेत. पोर्तुगीजानी भारतात आधनिक पद्धत सुरू केली. पोतुगीजांनी कोचीन शहरात शिक्षण संस्था स्थापन केल्या त्यांच्या शैक्षणिक उपक्रमांची केंद्रे मुंबई, गोवा, दमण, दीव, हुगळी व चितगाव इत्यादी ठिकाणी होते. या शाळांतून प्राथमिक शिक्षण पोर्तुगीज भाषेतून दिले जात होते. इ.स. 1571 मध्ये पोतगीजांनी गोव्यात महाविद्यालयाची स्थापना केली. स्नातक स्तरावरील शिक्षण देणारे हे भारतातील पहिले महाविद्यालय होय. यानंतर इ.स. 1600 मध्ये ब्रिटीशांनी भारतात 'ईस्ट इंडिया कंपनी' स्थापन केली. त्या काळातील भारतातील परिस्थिती लक्षात घेऊन या कंपनीने शिक्षण आणि धर्मप्रसाराचे काम हाती घेतले. ईस्ट इंडिया कंपनीने इ.स. 1614 मध्ये ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी पावले उचललीत. तसेच येथील लोकांना शिक्षण देण्यासाठी मिशनरीजना प्रोत्साहन दिले. ईस्ट इंडिया कंपनीचा अधिकारी चार्लस ग्रॅट हे 1773 साली भारतात आले व त्यांनी भारतातील परिस्थितीचे सुक्ष्म अध्ययन करून भारतीयांचे अज्ञान दूर करण्यासाठी एक योजना आखली.

या योजनेत भारतीयांसाठी इंग्रजी शिक्षण अतिशय महत्त्वाचे असल्यामुळे भारतीय शाळांमध्ये इंग्रजी हे शिक्षणाचे माध्यम असायला पाहिजे यावर भर दिला गेला. इ.स. 1765 नंतर ईस्ट इंडिया कंपनी ही भारतीय राजकारणातील अतिशय सामर्थ्यशाली सत्ता म्हणून पुढे आली आणि कंपनीच्या भारतीय शिक्षण विषयक धोरणांमध्ये फार मोठा बदल घडून आला. या कंपनीने शैक्षणिक क्षेत्रात विकासात्मक पावले उचलण्यासाठी कंपनीला योगय मार्गदर्शनाची आवश्यकता भासू लागली होती. यासाठी भारतीय शिक्षणाबाबतचा लॉर्ड मेकॉलेचा अहवाल 7 मार्च 1835 रोजी मंजूरी मिळाली. उच्च वर्गाला प्रथम शिक्षण देऊन हळूहळू सर्वसामान्य लोकांपर्यंत शिक्षण पाझरत जाईल असे स्पष्ट मत मॅकोले यांनी मांडले. यानंतर ईस्ट इंडिया कंपनीच्या बोर्ड ऑफ कंट्रोलच्या अध्यक्षपदो सर चार्लस वुड होते त्यांनी भारतातील शिक्षणाच्या विकासासंबंधीची माहिती प्राप्त करून घेऊन भारतातील शिक्षणाच्या परिस्थितीचे परीक्षण करून त्यातील समस्यांचा आढावा घेऊन या आधारावर 19 जुलै 1854 रोजी त्यांच्याच नावाने प्रकाशित करण्यात आले. भारतात आधुनिक शिक्षण पद्धती रूजविण्याचे कार्य सर्व श्रेय वुडच्या खलित्याला दिले जाते. 1857 च्या उठावानंतर भारताच्या शैक्षणिक इतिहासात अत्यंत महत्वपूर्ण बदल आले. इंग्लंडमधील General Council of Education in India ही संस्था स्थापन झाली. संस्थेच्या सदस्यांनी भारतातील गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन यांना भारतीय शिक्षणाबाबतच्या गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन यांना भारतीय शिक्षणाबाबतच्या सरकारच्या धोरणाची माहिती देऊन विनंती केली की, भारतीय शिक्षणव्यवस्थेचे सर्वांगीण सर्वेक्षण आणि सखोल चौकशी करून भारतातील शिक्षणात मोठया प्रमाणात विकास करण्यात यावा. त्यादृष्टिने 3 फेब्रुवारी 1882 ला 'भारतीय शिक्षण आयोग' स्थापन केला. या आयोगाचे अध्यक्ष विल्यम हंटर होते म्हणून भारतीय शिक्षण आयोग हा 'हंटर आयोग' या नावाने ओळखला जातो. यानंतर भारतीय शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी 1902 चा भारतीय विद्यापीठ आयोग व 1904 चा विद्यापीठ कायदा स्थापन केला. या कायद्याद्वारे विद्यापीठाचे कार्यक्षेत्र वृद्धिंगत झाले. यानंतर 1917–1919 या काळात सॅडलर आयोग किंवा कलकत्ता विद्यापीठ आयोग निर्माण झाला. मध्ययुगीन काळात अर्थात ब्रिटीश काळात शिक्षणाच्या धोरणात वेळोवेळी बरेच बदल करण्यात आले. ब्रिटिशांच्या योगदानामुळेच भारतात शिक्षण हे सार्वजनिक झाले. शुद्र, अस्पृश्य, आदिवासी आणि महिलांना शिक्षण घेण्याचा अधिकार प्राप्त झाला.

**आधुनिक काळातील शिक्षण :**

मध्ययुगीन काळात ब्रिटिशांच्या राजवटीत आधुनिक भारतातील शिक्षणाचा पाया तयार झाला होता. स्वांतत्र्य प्राप्तीनंतर भारतीय राज्यघटनेने धर्म, जात, वंश, पंथ आणि लिंग असा कोणताही भेद न करता शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केलीत. सर्व वंचित समाजाला शिक्षण घेण्याचा अधिकार राज्यघटनेने बहाल केला. भारतात आपल्या लोकांना शिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाने घेतली. त्यामुळे आधुनिक भारतात शिक्षण हे सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचले. 4 नोवहेंबर 1948 रोजी तत्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली 'विद्यापीठ शिक्षण आयोगाची' स्थापना केली. 'विद्यापीठ शिक्षण आयोग व माध्यमिक शिक्षण आयाग' या दोन्ही आयोगानी उच्च आणि माध्यमिक शिक्षणाबाबत महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या. त्या अनुषंगाने 14 जुलै 1964 रोजी 'भारतीय शिक्षण आयोगाची स्थापना केली. या शिक्षण आयोगाचे अध्यक्ष डॉ. दौलतसिंह कोठारी होते म्हणून या आयोगाला कोठारी आयोग या नावान संबोधण्यात आले. देशाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी, आर्थिक आणि तांत्रिक क्षेत्रात अधिक प्रगती करण्यासाठी तसेच सामाजिक आणि आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी देशाला राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची आवश्यकता वाटू लागली.

त्या दृष्टिने 1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार करण्यासाठी तत्कालीन प्रधानमंत्री राजीव गांधी यांनी प्रयत्न केले. यानंतर 1992 मध्ये सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सुधारणा करण्यात आल्या. 1980 नंतर जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाचा विशेष प्रभाव असल्याचे आढळून येते. विकसित देशांनी हया तिन्हीचा पुरस्कार केला. कारण त्यांना आपल्या देशातील विकसनशील आणि अविकसित या संकल्पना मुक्त आर्थिक धोरणाशी संबंधित आहेत. उदारीकरण म्हणजे देशाचे आर्थिक धोरण हे उदार असले पाहिजे तर खाजगीकरण म्हणजे देशातील उद्योग, सार्वजनिक क्षेत्र इत्यादींची मालकी ही शासनाकडे न ठेवता ते खाजगी क्षेत्र इत्यादींची मालकी ही शासनाकडे न ठेवता ते खाजगी मालकांकडे सोपविण्यात यावी 1991 नंतर आपल्या देशातील सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंद्याचे खाजगीकरण करण्यात आले. जगात शिक्षणाचे व्यापारीकरण करण्यात आले. शिक्षणाचे खाजगीकरण करण्यात आले. 1986 च्या धोरणाने उच्च शिक्षणाचे व्यापक प्रमाणात खाजगीकरण झाले. भांडवलदार वर्ग मोठमोठे कारखाने उभारण्याऐवजी मोठमोठ्या सर्व सोयींनी परिपूर्ण अशा शिक्षण संस्था सुरू करण्यात आल्या.

**शिक्षणाचे खाजगीकरण :**

महाराष्ट्र राज्यात खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यास परवानगी देणारे विधेयक विधिमंडळाने मंजूर करून शिक्षण क्षेत्रात एक क्रांतिकारी पाऊल टाकले आहे. अलिकडच्या काळात शिक्षण क्षेत्राकडे व्यापारी वृत्तीने पाहणाऱ्याची संख्या बरीच वाढली आहे. शिक्षण संस्था म्हणजे कंपनी आणि विद्यार्थी म्हणजे ग्राहक होय. ज्यांच्याकडे प्रचंड पैसा खर्च करण्याची ऐपत आहे, त्यांनाच शिक्षण विकत घेता येते. खाजगीकरणामुळे उच्च शिक्षणाचे मोठया प्रमाणात व्यापारीकरण झाल्याचे आढळून येते.

**समारोप :**

वर्तमानातील भारतीय शिक्षण व्यवस्था आणि विद्यार्थी दोघांचाही प्रवास साचेबद्ध पद्धतीने सुरू आहे. यातून शिक्षणाचे खरे व अंतिम ध्येय पूर्ण होत नाही. त्यामुळे शिक्षण पद्धती आणि विद्यार्थी दोघांचीही त्यांच्याभोवती असलेल्या साच्यातून मुक्तता होणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षण संस्थांच्या मदतीने सरकारने आराखडा आखण्याची गरज आहे. खासगी संस्था शिक्षणाचा व्यापार करतात. शिक्षण संस्थामधून मुल्यात्मक आणि प्रयोगशील शिक्षण देण्याची गरज आहे. मात्र, खासगी संस्था शिक्षणाचा व्यापार करीत असल्याचे निदर्शनास येते. समाजातील अनेक तरूण शेवटचा पर्याय म्हणून शिक्षकी पेशा स्वीकारतांना दिसून येतात. या सर्व गोष्टींमध्ये बदल होणे आवश्यक आहे. आज ज्ञानाचा वापर समाजाच्या नुकसानाकरता होत असताना ज्ञान माहिती, उच्च शिक्षण प्राप्त करून काय करायचे? तर विज्ञानाच्या शिक्षणासह शिक्षणाच्या विज्ञानाचा विचार करून बदलांचे आव्हान स्विकारायला हवे. आज विध्वंस करून देशाचे नुकसान करणारा मोठा वर्ग हा उच्च विद्याविभूषित आहे. विज्ञानाचा मोठा वापर–विध्वंसासाठी केला जात असून याला गेल्या आठ दशकांचा इतिहास आहे. प्राचीन आणि आधुनिक शिक्षणाचा सुवर्णमध्ये साधून, देशहितार्थ अपेक्षित परिणाम साधता येतील हा विचार व्यापक पातळीवर करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

1. डॉ. प्रदीप आगलावे – साईनाथ प्रकाशन, नागपूर
2. maharashtraties.indiatimes.com
3. https://mr.m.wikipedia.org>wiki>

ISSN 2349-638X
www aiirjournal.com